


# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक


df 1 : AH 6 / _mM 2014



ग्रंथालय : ज्ञानाचे सदावर्त



ग्रंथालयासाठी पुस्तकांची निवड




वाचू आनंदे

www.erc-pune.org

# संपादकीय

मानवाने माहिती मिळवण्यासाठी आणि माहितीचा संग्रह करण्यासाठी अनेक माध्यमे वापरली आहेत. प्राचीन काळात माहितीची देवाणघेवाण मौखिक पद्धतीनेच व्हायची. त्यामुळे माहितीचे संग्रहण केवळ पाठांतराने आणि स्मरणानेच व्हायचे. आज इंटरनेट, स्मार्ट फोन, संगणक यासारख्या आधुनिक साधनांनी हे काम केले जात असले तरी सुमारे २००० वर्षेतरी प्रारंभी हस्तलिखित ग्रंथ आणि नंतर छापील ग्रंथांच्या साहाय्याने माहिती आणि विचार यांचे संक्रमण आणि संग्रह होत आला आहे. त्यामुळे मानवी समाजाच्या इतिहासात ग्रंथ वाचन आणि ग्रंथालयांचे स्थान विशेष आहे. आधुनिक समाजाच्या निर्मितीत ग्रंथालयांनी मौलिक योगदान केले आहे. मानवी इतिहासातील अनेक संघर्षांमध्ये पाशवी वृत्तीच्या आक्रमकांनी ग्रंथालये जाळणे आणि उद्ध्वस्त करणे ही सामान्य बाब होती. अगदी अलिकडच्या काळात अफगाणिस्तानमध्ये तालिबानी अतिरेक्यांनी तेथील विद्यापीठांमधील ग्रंथालये नष्ट केल्याचे उदाहरण ताजे आहे. जगातील अनेक क्रांतिकारक बदलांमागची प्रेरणा ग्रंथांमधील विचार होती हे उघड असत्य आहे. विचारांबरोबरच मानवी भावभावनांची जडणघडण आणि अभिव्यक्ती करण्यामध्ये ललित साहित्यचा वाटा मोठा आहे. रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांची मोहिनी आजही समाजमनावर टिकून आहे.

२१ व्या शतकाच्या प्रारंभी जगभरातच छापील अक्षर वाङ्मयाच्या भवितव्याबद्दल शंका घेतली जाऊ लागली आहे. ई-बुकाच्या निर्मितीमुळे आणि दृक्श्राव्य माध्यमांच्या प्रकारामुळे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होईल असे वाटू लागले. शालेय स्तरापासून 'वाचाल तर वाचाल' हा घोष सुरू झाला आहे. मुलांच्यात वाचनाची आवड जोपासण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू झाले आहेत. ग्रंथजत्रा, पुस्तक हंडी, साहित्य संमेलने या सारख्या उपक्रमांद्वारे समाजाला वाचनाचे वेड लावण्याचे प्रयोग केले जात आहेत. मानवी उत्क्रांतीमध्ये जुने सारे हरवून जाऊ नये यासाठी प्रयत्न करणाऱ्यांत शाळा, ग्रंथपाल आणि शिक्षक यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. असे प्रयत्न या अंकामध्ये आपल्याला वाचायला मिळतील. आपले असे प्रयोग 'ई-प्रशिक्षकाकडे' जरूर कळवावेत.

**- विवेक पोंक्षे**

# ग्रंथालय : ज्ञानाचे सदावर्त

मानव हा सामाजिक प्राणी. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागल्यावर माणसाची बौद्धिक भूक प्रज्वलित झाली. तसेच स्वत:चे विचार, भावभावना, सुख-दु:खे इतरांबरोबर वाटून घ्यावीशी वाटली. त्यातूनच उदयास आले कला आणि साहित्य. भाषा-लिपीच्या चौकटीतून साहित्य पुस्तकाच्या माध्यमातून सादर झाले. छपाईचा शोध लागल्यावर ज्ञान, विचार जास्तीत जास्त प्रमाणात प्रसृत करण्याचे काम सुलभ झाले. मानवी संस्कृतीचे प्रगल्भ प्रतिक म्हणजे पुस्तक होय. पुस्तक या शब्दांत ध्वनित होते ती प्रचंड मोठी ज्ञानाची परंपरा. ज्ञानकर्त्यांचे विचारधन पसरवणारे प्रतिनिधी. काव्य, शास्त्र, विनोद, कथा, कादंबरी, वैज्ञानिक शोध, तत्त्वज्ञान, इतिहास असे सर्व काही समाजापर्यंत पोचवण्याचे साधन म्हणजे 'ग्रंथालय.'

साहित्यसम्राट श्री. न. चिं. केळकर ग्रंथालयाला 'ज्ञानाची सदावर्ते' म्हणतात. ग्रंथालयाला ज्ञानाचे सदावर्त करायचे असेल तर ग्रंथालयात '**मुक्तद्वार पद्धत**' असली पाहिजे. या पद्धतीत वाचकाला थेट ग्रंथापर्यंत जाण्याची संमती असते. वाचक स्वत: ग्रंथ हाताळू शकतो, चाळू शकतो. त्यामुळे अनेक ग्रंथांची माहिती होऊन वाचकाची उत्सुकता वाढते. मुक्तद्वार पद्धतीमुळे ग्रंथांची विषयानुसार केलेली मांडणी विस्कळीत होते. काही वेळा ग्रंथ गहाळ होतात. परंतु ग्रंथ हाताळायला मिळाल्याने तसेच मुखपृष्ठावरील चित्र पाहून पुस्तकाबद्दल आकर्षण निर्माण होते, जिज्ञासा वाढते हा मोठा फायदा होतो.

आपल्याकडे असलेल्या चांगल्या, मौल्यवान पुस्तकांचे वाचन झाल्यावर ती पुस्तके आपल्याकडे पडून असतात. किमती पुस्तके असल्यामुळे कोणाला कायमची देऊन टाकायची मानसिकता नसते. परंतु पुस्तकांचा चांगला उपयोग वाचकाला होणार असेल आणि काही दिवसांनी चांगल्या अवस्थेत आपल्याला परत मिळणार असतील तर अशी पुस्तके ग्रंथालयाला देण्याची ज्यांची तयारी असते अशा हितचिंतकांची पुस्तके '**ग्रंथालय ठेव**' या योजनेअंतर्गत स्वीकारावीत. ठेवीदारांच्या पुस्तकांना बांधणी करून मग ती वापरली जावीत.

रिकाम्या तासाला मुलांनी वाचन करावे, तो वेळ सत्कारणी लागावा या दृष्टीने '**पुस्तक पेटी**'ची योजना उपयोगी आहे. प्रत्येक वर्गासाठी साधारण ४०-४५ मासिके, पुस्तके निवडावीत. रिकाम्या तासाला ही पुस्तके ग्रंथालयातून वर्गात नेता येतील.

क्रांतीकारकांची चरित्रे, संत वाङ्मय, विज्ञान, कविता अशा वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकांचे समयानुरूप '**पुस्तक प्रदर्शन**' भरविले जावे. काही वेळा ग्रंथालयात असलेली विशेष पुस्तके विद्यार्थ्यांनी पाहिलेली नसतात, त्यांचे लक्ष गेलेले नसते; परंतु प्रदर्शनामुळे प्रकर्षाने ती पुस्तके लक्षात येतात. त्या पुस्तकांची माहिती होण्यासाठी प्रदर्शनाचा उपयोग होतो.

विद्यार्थ्यांनी आवर्जून वाचावीत अशी माहिती, लेख यांची वर्तमानपत्रातील कात्रणे काढून ग्रंथालयातील '**कात्रण फलका'वर** लावली जावीत. ग्रंथालयातील '**अभ्यासिके'चा** वाचन व अभ्यासासाठी चांगला उपयोग होतो. तिथे विद्यार्थ्यांना शांत, एकाग्रचित्ताने अभ्यास करता यावा अशी व्यवस्था असावी. ग्रंथालयाचे 'संगणकीकरण' होणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी **संगणक व इंटरनेट सुविधा** उपलब्ध करून द्यावी. वाढदिवसानिमित्त विद्यार्थी ग्रंथालयाला '**पुस्तकभेट**' देऊ शकतील. तसेच अन्य हितचिंतकांतर्फे देखील '**ग्रंथदेणगी**' मिळवून ग्रंथालय समृद्ध करता येईल.

**वाचकवीर योजना :** संपन्न भविष्याच्या तरतुदीकरिता वाचनसंस्कृती महत्त्वाची आहे. वाचनसंस्कृतीवर दूरदर्शनचे अतिक्रमण वाढत आहे. त्यामुळे वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत आहे. भावी पिढीच्या भविष्याच्या दृष्टीने हे अनुचित आहे. विद्यार्थ्यांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण कमी होते आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर येथे 'वाचकवीर योजना' राबवली जाते. प्रार्थनेच्या वेळेस अध्यापक पुस्तक-परिचय करून देतात. ग्रंथपाल रिकाम्या तासांना नवीन आलेल्या पुस्तकांसंबधी तसेच वाचनीय अशा चांगल्या पुस्तकांसंबंधी बोलतात. वाचकवीर योजनेअंतर्गत जे विद्यार्थी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करतात त्यांना पारितोषिके दिली जातात.

सुरुवातीला विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तके वाचायला सांगितली होती. परंतु असे दिसून आले की विद्यार्थी कथा-कादंबऱ्या, साहसकथा वाचतात; पण प्रवासवर्णन, कविता, चरित्र, आत्मचरित्र अशा साहित्य प्रकारांकडे फारसे वळत नाहीत. हे साहित्य प्रकारसुद्धा त्यांनी वाचावेत यासाठी या साहित्य प्रकारातील ग्रंथालयात असलेली चांगली पुस्तके त्यांना सुचवली जातात. प्रत्येक इयत्तेला पुस्तकांची मार्गदर्शक यादी दिली जाते. ही यादी मुलांच्या वयाचा, अभ्यासक्रमाचा विचार करून दिली जाते.

प्रत्येक इयत्तेला किमान पृष्ठांचे उद्दिष्ट दिलेले असते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या वर्षभरातील पुस्तकांच्या देवघेवीची नोंद ठेवली जाते. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातून नेलेले पुस्तक खरेच वाचले का नाही ते कळत नाही. यासाठी गटचर्चा घेतल्या जातात. विद्यार्थ्यांनी वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांपैकी एखाद्या पुस्तकासंबंधी त्याला गटात बोलायचे असते. गटचर्चेच्या वेळी काही विद्यार्थ्यांना वर्षाच्या सुरुवातीला वाचलेले वर्षाच्या अखेरीस आठवत नाही. काही विद्यार्थ्यांनी पुस्तक खरेच वाचलेले नसते. असे अनेक अनुभव येतात.

विद्यार्थी ग्रंथालयाची वही करतात. त्यांनी वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांविषयी ते या वहीत लिहितात. स्वत:ला समजलेले स्वत:च्या शब्दांत मांडण्याचे कौशल्य यामुळे वाढते. वाचकवीर योजनेत ६० गुण पृष्ठांच्या उद्दिष्टपूर्ततेला, २० गुण ग्रंथालय वहीला व २० गुण गटचर्चेला असतात. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ज्या विद्यार्थ्यांनी पृष्ठांचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे, ग्रंथालयाची वही लिहिली आहे त्या सर्वांना पारितोषिक दिले जाते.


या योजनेची परिणामकारकता पाहण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती यांच्या माध्यमातून कृती संशोधनात सर्वेक्षण पद्धतीने निरीक्षणे नोंदवली. १) वाचनाने विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढते आहे. २) वाचनाचा विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगला उपयोग होतो. लेखनकौशल्य वाढते. ३) वाचकवीरांना कमी वाचन असणाऱ्यांपेक्षा अधिक जाण असते. ४) वाचनाने विद्यार्थ्यांची संवेदनशीलता वाढते व त्यामुळे स्वत:बरोबर दुसऱ्याचाही विचार करायला शिकतात. ५) वाचनाने विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गुणांमध्ये चांगली वाढ होते. वृत्तीमध्ये चांगले बदल झालेले दिसतात. (चिकाटी, महत्त्वाकांक्षा, सहकार्य, सकारात्मकता इ.)

या योजनेमुळे विद्यार्थ्यांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढले आहे. एखादे चांगले पुस्तक वाचले की वाचकाच्या व्यक्तिमत्त्वात लगेच बदल होतो असे नाही. चांगले वाचन केल्यावर वाचकाच्या वृत्तीत हळूहळू फरक पडतो. कालांतराने हा फरक वाचकाच्या लक्षात येतो. चौफेर वाचनाने विद्यार्थ्यांचा बौद्धिक, मानसिक, वैचारिक, आत्मिक असा सर्वांगीण विकास होतो. ग्रंथमैत्रीतून होणारा फायदा व्यक्तिगत राहात नाही. त्याचा लाभ कौटुंबिक, सामाजिकही होऊ शकतो. विद्यार्थी स्वत:पलीकडे पाहायला शिकतात. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागण्यासाठी वाचकवीर योजना नक्कीच मोलाची ठरते. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीला चांगली मदत होते, म्हणून हा वाचनाचा आग्रह !!

**– सौ. माधुरी बारपुते**
बाल विकास मंदिर, ज्ञानप्रबोधिनी, सोलापूर

असरद्वारा प्रकाशित शैक्षणिक गुणवत्ता अहवाल पाहण्यासाठी भेट द्या.

www.asercentre.org





# ग्रंथालयासाठी पुस्तकांची निवड

ग्रंथ ही महाशक्ती आहे हा विचार पटवून देताना श्री. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'ग्रंथसत्ता' या शब्दाचा समर्पक वापर केला आहे. इतिहासाचे अवलोकन केले असता व्यक्तिविकासाबरोबर समाजविकासाच्या प्रक्रियेतही अनेक ग्रंथांनी सत्ता गाजवली असे दिसून येते. 'विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हा गुळगुळीत शब्दप्रयोग शिक्षणाच्या संदर्भात आपण नेहमी वापरत असतो. पण त्यासाठी आवश्यक असलेल्या उपलब्ध साधनसामग्रीचा वापर जास्तीत जास्त प्रभावीपणे कसा करता येईल याचा विचार आपण डोळसपणे करत नाही. त्यात काही वेळा वेळाची कसरत, आळस आणि मुख्य म्हणजे जागरुकतेचा अभाव या गोष्टी कारणीभूत असतात. त्यातील एक महत्त्वाचे साधन म्हणजे ग्रंथालय!

एका प्रथितयश मोठ्या शाळेत काही कार्यक्रमानिमित्त गेले असता तेथील अध्यापकांनी शाळेतील ग्रंथालय कौतुकाने दाखवले. कुणालाही अध्यापकांना हेवा वाटावा अशी अनमोल ग्रंथसंपदा ग्रंथालयात खच्चून भरलेली होती. पण त्याच शाळेत शिकत असलेल्या माझ्या ओळखीच्या, वाचनासाठी भुकेल्या असणाऱ्या, जिज्ञासू, उत्साही विद्यार्थ्यापर्यंत त्यातील एकही पुस्तक पोहोचले नव्हते.

याउलट दुसऱ्या एका शाळेत ग्रंथालय समृद्ध करण्यात अध्यापकांचा वाटा कसा असतो, मुलांपर्यंत पुस्तके पोहोचण्यासाठी, ग्रंथालय चालवण्यासाठी उत्साही पालकांचा कसा सहभाग असतो याविषयी माझी एक मुख्याध्यापक मैत्रिण मोठ्या अभिमानाने सांगत होती.


तिसरे चित्र- पुण्याजवळच्या एका खेड्यात माझा एक ध्येयवादी मित्र मुख्याध्यापक म्हणून काम करतो. तिथले ग्रंथालय पाहायला मी मोठ्या उत्साहाने गेले तर अक्षरश: एका छोट्या कपाटात मावतील एवढीच पुस्तके असलेले ते ग्रंथालय. काही विद्यार्थी मात्र त्यातल्या पुस्तकांचे आवडीने वाचन करताना दिसत होते.

प्रत्येक ठिकाणची आर्थिक परिस्थिती, मनुष्यबळ, सामाजिक वातावरण यांच्या मर्यादा मान्य करूनही अध्यापकांचा ग्रंथालयांकडे बघण्याचा दृष्टीकोण खूप महत्त्वाचा ठरतो. ग्रंथालयाचे संख्यात्मक मूल्य वाढवण्याबरोबरच गुणात्मक मूल्य वाढवायचे असेल तर ग्रंथालयासाठी केली जाणारी ग्रंथखरेदी याकडे लक्ष पुरवायला हवे. ग्रंथालयांसाठी पुरेसे अनुदान उपलब्ध नसते हा मुद्दा विचारात घेऊनही जे उपलब्ध आहे त्यातून चांगली पुस्तके कशी खरेदी करता येतील याचे नियोजन केले तर ग्रंथालयाची गुणवत्ता नक्कीच वाढेल.

विद्यार्थांच्या पाठ्यपुस्तकात ज्या पुस्तकातील उतारे निवडले आहेत त्या पुस्तकांच्या काही प्रती ग्रंथालयात निश्चित असायला हव्यात. मुलांना काय आवडते व त्यांनी काय वाचलेच पाहिजे अशा पुस्तकांची क्रमवार यादी आपल्याजवळ तयार असेल तर पुस्तकखरेदी करताना अडचण येणार नाही. तसेच केवळ कथा कादंबरी अशी मनोरंजक पुस्तके वा अतिसंस्कारक्षम पुस्तके असा विचार न करता सर्व वाङ्मयप्रकारांचा परिचय होईल अशी पुस्तकांची निवड करावी. कथा, कादंबरी, ललितलेख, प्रवासवर्णन, ज्ञान-विज्ञान, सामाजिक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र, साहसकथा इ. विभागश: याद्या जर आपल्या ग्रंथपाल व मुख्याध्यापक यांच्याकडे आपण दिल्या व चांगल्या पुस्तकांच्या खरेदीचा आग्रह धरला तरच ग्रंथालय समृद्ध होणे शक्य आहे.

आपल्या ग्रंथालयात जुनी पुस्तके कोणती आहेत, नवीन प्रकाशित होणारी कोणती पुस्तके वाचनीय आहेत याची जाण असणारे काही अध्यापक निश्चितच प्रत्येक शाळेत असतात. तसेच प्रत्येक विषयासाठी कोणते संदर्भग्रंथ ग्रंथालयात असायलाच हवेत याची एकत्रित चर्चा करून पुस्तकांची यादी तयार करावी. अध्यापकांना व विद्यार्थ्यांना लागणारे संदर्भग्रंथ, कोश-नवनवीन माहितीचा साठा असणारे विविध विषयांवरचे कोश हल्ली अतिशय आकर्षक रूपात प्रकाशित होत आहेत. कोणत्याही विषयाच्या संदर्भात शंका उत्पन्न झाली असता तिचे निराकरण करून घेता येईल अशी पुस्तके ग्रंथालयात हवीतच. अन्यथा विद्यार्थ्यांची जिज्ञासा पुरी करण्याऐवजी ती दाबून टाकण्याचे महत्पाप अध्यापक म्हणून आपल्या हातून घडत असते. तसेच कधीतरी भूतकालात केलेल्या अध्ययनाच्या पुंजीवर आपली अध्यापनाची गुजराण चालू असेल तर तोही गांभिर्याने विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

खास मुलांसाठी प्रकाशित होणारी किशोर, अमृत, कुमार, आनंद, छात्र प्रबोधन, सृष्टिविज्ञान, Science Reporter सारखी मासिके आपल्या ग्रंथालयात हवीतच. अद्ययावत माहिती व भरपूर मनोरंजन करणारी अनेक मासिके अध्यापक व विद्यार्थी दोघांनाही ताजे ठेवण्याचे काम करतात. आपण सतत नवे वाचावे व मुलांना वाचायला प्रवृत्त करावे यात अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया खूप सकसपणे होत असते.






प्रकाशकांकडून येणाऱ्या याद्यांतून कमिशनचा विचार करून उपलब्ध अनुदानात कशीतरी पुस्तकखरेदी उरकली जाऊ नये. यासाठी शक्य असल्यास ग्रंथपाल अन्यथा पुस्तकांची जाण असणारे अध्यापक यांनी प्रसंगी एखादा दिवस पुणे–मुंबईसारख्या शहरात विविध प्रकाशनांच्या दुकानात जाऊन किंमतीचा विचार करून जास्तीत जास्त चांगली पुस्तके कशी खरेदी करता येतील त्याचा विचार करावा. या धोरणाचा अवलंब केल्यास ग्रंथालय अधिक समृद्ध होईल. दर वर्षी भरणाऱ्या साहित्य–संमेलनात अक्षरश: सर्व प्रकाशकांचे स्टॉल्स असतात. तेथे पुस्तके तुलनात्मक दृष्टीने पाहता येतात. शक्य झाल्यास तेथे भेट देता आली तर उत्तमोत्तम पुस्तके आर्थिक मर्यादा असूनही खरेदी करता येतील.

पाठ्यपुस्तके खरेदी करणे शक्य नसलेली काही मुलेही शाळेत असू शकतात. त्यासाठी पाठ्यपुस्तकांच्या काही प्रतीही ग्रंथालयात असाव्यात. सरकारच्या स्वस्त पुस्तकविक्रीच्या योजना, N.C.E.R.T. ची पुस्तकप्रकाशने, National Book Trust, बालकुमार साहित्य मंडळ, मराठी साहित्य परिषद, साहित्य संस्कृती मंडळ यांच्यातर्फे अनेक अनमोल पुस्तके अति अल्प किंमतीत विकली जातात. त्याची माहितीही करून घ्यावी. प्रसंगी खूप महाग असणारे तरीही अतिशय उपयुक्त असणारे असे काही कोश घेण्याचा आग्रह आपण धरायला हवा. सर्व पुस्तके आपण एकदम खरेदी करू शकणार नाही. पण योग्य नियोजन असेल तर हळूहळू ग्रंथालयात चांगली पुस्तके जमा होत राहतील. अध्यापकांना असणाऱ्या अनेक कामांतून यासाठी वेळ काढून नीट नियोजन केले तर दरवर्षी त्यात भर घालण्याचे काम हे खूप कमी वेळ खाणारे असेल.

इ. ५ वी, ६ वी, ७ वी, ८ वी, ९ वी, १० वी या वयोगटाच्या मुलांनी काय वाचायला हवे व त्यांना काय वाचायला आवडते त्यानुसार पुस्तकांच्या याद्या कराव्यात. आज मुलांच्या त्या त्या वयाला अनुरूप अशी छान आकर्षक पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. त्या सुंदर मोहमयी दुनियेची झलक आपल्या ग्रंथालयात मुलांना अनुभवायला मिळावी. वाङ्‌मयाचे समृद्ध दालन बंदिस्त खजिन्याप्रमाणे राहता कामा नये. जीवनाला सर्वांगाने सामोरे जाण्यासाठी, व्यक्तिमत्त्वाचा ओलावा जपण्यासाठी, भावकोष समृद्ध होण्यासाठी, ज्ञान–पिपासा तल्लख जागी राहण्यासाठी, सत्यातील व कल्पनेतील विश्वरूपदर्शन त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी ग्रंथ हे एक माध्यम आहे. हा विचार एकदा मान्य केला की ग्रंथालयातील ग्रंथखरेदी हा आपल्या चिंतनाचा, जिव्हाळ्याचा विषय बनतो.

शेवटी सर्वांत महत्त्वाचा मुद्दा! ग्रंथखरेदी झाली पण ती मुलांपर्यंत पोहोचलीच नाही तर तिचा काय उपयोग? विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या, ग्रंथपालांची कमतरता यावर जबाबदार गुणी विद्यार्थ्यांचे तसेच उत्साही पालकांचे सहकार्य हा उपाय वा प्रयोग करून पाहायला हवा. न वापरता निर्जीव शोभेसारखी पुस्तके कपाटात बंद राहण्यापेक्षा प्रसंगी वापर करून फाटली, गहाळ झाली तरी हरकत नाही असे थोडे उदार धोरण असायला हवे. त्यासाठी ग्रंथपालाला जबाबदार धरून किंमत भरून घेणे हा उपाय नाही. आपल्या अनेक मागण्यांपैकी हीही एक आग्रहाची मागणी असायला हरकत नाही.


ग्रंथालये ही जर ज्ञानाची सदावर्ते बनायची असतील तर त्यात सतत नवीन भर पडायला हवी आणि त्यांचा ओघ वाचकांकडे जायला हवा. मंगेश पाडगावकरांनी एका कवितेत म्हटलंय–

''ग्रंथ कोंडून ठेवू नका कपाटात सुरक्षित
नको पहाऱ्यावर तुसड्या चेहऱ्याचे रखवालदार
जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते
कपाटांच्या कबरीत गाडले जातात, विचारांचे मुडदे.''

मानवी जीवन क्षणभंगुर असलं तरी त्यातले काही क्षण चिरंजीव करण्याचे काम ग्रंथ करीत असतात. जगण्यासाठी भाजी–भाकरीबरोबर आणखीही काही हवे असते ते पाथेय आपल्याला पुस्तके देऊ शकतात म्हणून अशी पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हे अध्यापक म्हणून आपले कर्तव्य आहे ही जाणीव मनात असली तर ग्रंथ खरेदी आणि ग्रंथालये यासंबंधी ज्या अडचणी असतील त्यावर मात करण्याचा रस्ता आपल्या नजरेला स्वच्छ दिसायला लागेल!

**– शैलजा देशमुख**
(प्रशिक्षक वर्ष ३ अंक १ मधून पुनर्मुद्रित)

# पुस्तक परिचय




## 'वाचू आनंदे'

'पुस्तकं आपल्याला कल्पनेच्या जगात घेऊन जातात, स्वप्नं दाखवतात, पण त्याचबरोबर आपण पाहात असलेलं, ज्यामध्ये आपण जगत असतो ते जगही समजून घ्यायला शिकवतात. शब्दांमधून जसं जग दिसतं, तसं रंगरेषांमधूनही जाणवतं. तेव्हा ते तितकंच मनोहारी असतं. शब्द आणि रेषांचं जग बरोबरीनं अनुभवता आलं तर आपलं जगाकडे पाहणं अधिक सुंदर होतं.'

हे उद्‌गार आहेत 'वाचू आनंदे' च्या संपादक माधुरी पुरंदरे आणि साहाय्यक नंदिता वागळे यांचे!

प्रत्येक मराठी वाचणाऱ्याच्या घरात हवाच असा हा चार पुस्तकांचा संच 'वाचू आनंदे' आपल्याला खरोखरीच वाचनाचा आनंद मिळवून देतो. या संचाचे बालगट आणि कुमार गट असे दोन भाग असून प्रत्येक भागात दोन पुस्तके आहेत. मराठी साहित्यातील बहुतेक सर्व साहित्य प्रकार यात अंतर्भूत आहेत. हे बालसाहित्य नसून मोठ्या माणसांचं पण मुलांनी अवश्य वाचावं असं साहित्य आहे.

त्याचबरोबर कलेच्या प्रांताची ओळख व्हावी म्हणून प्रत्येक लेख, कथा, कविता याबरोबर प्रसिद्ध भारतीय चित्रकारांची चित्रे वाचकांसमोर येतात. ही साहित्यानुरूप मुद्दाम काढलेली चित्रे नसून, त्या चित्रकारांची ती विशेष कलाकृती आहे आणि तरीही त्या पानावरील मजकुराला साजेल असाच त्या कलाकृतीचा विषय आहे. उदा. लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रातील एक गद्यांश दिलेला आहे आणि त्याचबरोबर शिल्पकार हरीश तालीम यांचे 'वाचणारी मुलगी' हे प्लास्टर शिल्प लक्ष वेधून घेते. चित्रांचे प्रकार आणि शैली याची माहिती मुलांना वाचनाबरोबरच देणं हा अतिशय नावीन्यपूर्ण प्रयोग वाटतो. शेवटच्या भागात या कलापरंपरांची संक्षिप्त माहितीही मिळते.

बालगट – भाग एक यामध्ये सूत्रविषय दिलेले आहेत. उदा. निसर्ग, प्राणीसृष्टी, बालपण, कुटुंब. या सूत्रांनुसार साहित्यकृतींची विभागणी केलेली आहे. वाचक जसजसे वाचत जातात, तसतसे सूत्र उलगडत जाते. बालगटात 'सांज उन्हाच्या चार पाकळ्या' या शांता शेळकेंच्या कवितेबरोबर येते एक सुंदर वारली लोकचित्र. 'देवराईचा अस्त' या प्रकाश गोळ्यांच्या लेखाबरोबर चित्रकार नंदलाल बोसांचं 'वृक्ष' हे चित्र देण्याची कल्पकता यात आहे. ज्ञानदेव, तुकारामांपासून वि. आ. बुवा, प्र. ई. सोनकांबळे अशा सर्वांचे उत्कृष्ट साहित्य यात समाविष्ट आहे.

चित्रकार सतीश गुजराल, आरा, हेबर, प्रफुल्ला डहाणूकर वगैरे अनेक मान्यवरांपैकी कोणाची शिल्पे तर कोणाची शाई रेखाटने, जलरंग व तैलरंगातील चित्रे, ब्राँझची शिल्पे, टेम्पेरा व वारली शैलीतील चित्रे येथे दिसतात. या सर्वांचा संक्षिप्त परिचय पुस्तकाच्या शेवटी आहे.

बालगट – भाग २ ची सूत्रे आहेत– घर, गाव, प्रदेश, रस्ते, प्रवास, शिक्षण वगैरे. बा. भ. बोरकरांच्या 'माझे घर' या कवितेबरोबरच ए. ए. रायबा यांचे तैलरंगांतील गोव्याच्या घराचे चित्र येते आणि वाचक केव्हाच गोव्याच्या घरात जाऊन पोचतो. श्री. बा. रानडे यांच्या 'लहानपणाचा प्रवास' या कवितेखाली एक आगगाडीचे भिल्ल भित्तीचित्र आहे. या पुस्तकाच्या शेवटी चित्रकारांचा परिचय आणि आधुनिक कलाविचार मांडलेला आहे. तसेच 'शिक्षक-पालकांसाठी दोन शब्द' मध्ये काही विशेष मुद्दे आहेत ते सर्व प्रौढांनी अवश्य वाचावे.

ही पुस्तके मुलांसाठी असली तरी रूढ अर्थाने ज्याला आपण 'बालसाहित्य' म्हणतो त्याचा समावेश यात नाही. या पुस्तकांच्या निर्मितीमागे शैक्षणिक उद्दिष्ट आहे. पण ते काहीसे छुपे आहे. ही पाठ्यपुस्तके नाहीत, परंतु एखाद्या शिक्षकाला वर्गात चालू असलेल्या विषयाशी यातले साहित्य जोडून घेता येईल. विषय रंजक होण्यासाठी पूरक साहित्य म्हणून याचा वापर करता येईल. शिक्षकांनी चित्रांकडे मुलांचे लक्ष वेधावे म्हणजे चित्राचा आस्वाद घेण्याचे मुलांना हळूहळू कळेल.

शालेय शिक्षणाशी संबंध जोडता भूगोलाच्या तासाला प्रभाकर पेंढारकरांच्या 'हिमालय' चा पूरक वाचनासाठी उपयोग होईल. जीवशास्त्र शिकवताना ना. ग. गोरेंचा 'जन्म' हा उतारा, रा. चि. जोशींचा 'पैठरचे वाडे' वगैरे अनेक उदाहरणे देता येतील.

कुमारगट – भाग १ व भाग २ मध्ये सूत्रे तीच आहेत. प्रस्तावनेत साहित्य, चित्रकलेतील नवे–जुने प्रवाह व त्यांची ओळख मुलांना करून देणे हे स्पष्ट केलेला आहे.

यात व्यंकटेश माडगूळकरांच्या 'दादा' या व्यक्तिचित्राला त्यांची स्वयरेखाटनचित्रे आहेत. नरेंद्र जाधवांच्या 'मातोसरी' या स्वत:च्या आईबद्दल लिहिलेल्या लेखाला रवीद्रनाथ टागोरांनी काढलेले शाईचित्र आहे.

अरुणा ढेरेंच्या 'जाईजुई' ला राजा रविवर्मा यांचे 'अहिल्या' हे तैलरंगातील गाजलेले चित्र आहे. 'चित्रपट कसा पाहावा?' या लेखाबरोबर विविध चित्रपटांची पोस्टर येतात आणि त्यानंतर कवी डहाके यांची 'अमिताभ' ही कविता .
विषयांची विविधता यात इतकी आहे की तबला कारागीर, मॅजिक लँटर्न, गायिका नूरजहान यांवरील साहित्याचा अंतर्भावही आहे.

कुमारगटांच्या पुस्तकांच्या अखेरीस भारतीय कलापरंपरेचे प्रकार दिले आहेत. उदा. कलमकारी, छायाबाहुल्या वगैरे. दुसऱ्या भागात वटी अमित अंबालाल, सुभाष अवचट, गायतोंडे, दलाल, देऊसकर या चित्रकारांचे संक्षिप्त परिचय आहेत.

एकंदर या पुस्तकांची रचना अशी आहे की कुठलेही पान काढावे आणि वाचायला सुरुवात करावी. वाचणे थांबवावे वाटले तर दुसरी चित्रे पाहावीत. केवळ अंतर्गत भागातीलच नव्हेत, तर मुखपृष्ठ, मलपृष्ठावरील प्रस्तावना, दोन शब्द सर्व काही वाचलेच पाहिजे, असे आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालिका सरोजिनी वैद्य यांचे निवेदनही उपयुक्त आहे. पुस्तकांची निर्मिती करताना मराठी साहित्य आणि भारतीय कला या क्षेत्रांचा संपादकांना केवढा शोध घ्यावा लागला असेल हे समजून येते. या संचाचे प्रकाशन वेगळ्या प्रकारे झाले. अक्षरनंदन शाळेतील बालचमूंनी यातील गद्य, पद्य यांचे सादरीकरण शिक्षकांच्या साहाय्यानं केले.

या पुस्तकाची तांत्रिक बाजूही उत्कृष्ट आहे. पानाच्या डाव्या बाजूस लेखक, कवीचा संक्षिप्त परिचय व शब्दार्थ आहेत. छपाई उत्तम व सर्व रचना कलात्मक आहे. बांधेसूद बांधणीची ही पुस्तके भरपूर मजकुराने, चित्रांनी भरलेली आहेत.

पण मुख्य प्रश्न किंवा एक विचार असा आहे की विद्यार्थ्यांना ही पुस्तके काहीशी जड वाटतील का? शिक्षकांना ही पुस्तके वाचताना जो आनंद होतो, तसा विद्यार्थ्यांना होतो का? याचा थोडा मागोवा घ्यायला हवा. बालगटांची पुस्तके कदाचित कुमारगटाच्या विद्यार्थ्यांना वाचावीशी वाटतील तर कुमारगटाची प्रौढांना. पण संपादकांनी म्हटल्याप्रमाणे हे गट म्हणजे 'वॉटर टाईप' कंपार्टमेंट नव्हेतच. ज्याला जे भावते, रुचते आणि पचते त्याने ते वाचावे आणि पाहावे. उत्कृष्ट साहित्य समोर ठेवलेले आहे.

वाचनसंस्कृती नष्ट होऊ लागली आहे की काय, असे भय वाटणाऱ्यांसमोर हा अनमोल खजिना उपलब्ध आहे. तो मुलांपर्यंत कसा पोहोचवायचा याचा प्रयोग करणे महत्त्वाचे आहे.

एकूण काय, तर प्रत्येक मराठी वाचणाऱ्यांच्या संग्रहात 'वाचू आनंदे' हा संच हवाच.

पुस्तक परिचय
'वाचू आनंदे' (चार पुस्तकांचा संच)
किंमत प्रत्येकी रु. ७५/–
प्रकाशन– जोत्स्ना प्रकाशन, राज्य मराठी विकास संस्था
संपादन – माधुरी पुरंदरे, नंदिता वागळे

**– प्रा. निलीमा करमरकर**
ब/५, शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता, पुणे–०४
(प्रशिक्षक वर्ष ५ अंक ५ मधून पुनर्मुद्रित)



**वाचकवीर योजनेसाठी निवडलेल्या पुस्तकांची यादी**
**इ. ५ वी व ६ वी**

## (१) कथा – कादंबरी

| पुस्तक | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| सु-नीतिकथा – माला भाग १ | मा. गो. काटकर |
| कहाणी दोन भावांची | सुहासिनी देशपांडे |
| विनूची आई | सुभाष देशपांडे |
| शिवाई | मदन हजेरी |
| मृत्युंजयांच्या कथा | दत्ता टोळ |
| श्रेष्ठ भारतीय बालकथा | संपादक – बाबा भांड |
| कष्टाचे मोल | सुचित्रा सरपोतदार |
| दरवळ | संपादन – शैलजा देशमुख |
| कुमार कथा भाग – २ | संपादक – अमरेन्द्र गाडगीळ |
| जासूस मुन्ना आणि इतर कथा | वसुमती धुरु |
| आम्ही पुत्र भगीरथाचे | गो. नी. दांडेकर |
| क्षिप्रा | शरच्चंद्र मुक्तीबोध |
| विप्लवा | अरुण साधू |
| मिरासदारी | द. मा. मिरासदार |
| स्मृतिचित्रे | लक्ष्मीबाई टिळक |
| तोत्तोचान | अनु. चेतना सरदेशमुख |
| दुर्दम्य | गंगाधर गाडगीळ |
| वनवास | प्रकाश संत |

## (२) ऐतिहासिक

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| मुलांसाठी जगाचा इतिहास | मालन देवकुळे |
| शिवरायांचा आठवावा प्रताप | संकलक – अनघा कुकडे लव |
| राजपूत | सुधाकर प्रभू |
| भले बुद्धिचे सागरः नाना | सुवर्णा लिमये |
| लोकांचा राजा शाहू महाराज | दत्ता टोळ, अशोक आफळे |
| रणधुरंधर संताजी घोरपडे | इला रिसबुड |
| कान्होजी आंग्रे | मंजली ताम्हणकर |
| शिवरायांचे शिलेदार – तानाजी मालसुरे | प्रभाकर भावे |
| छत्रपती शिवाजी | एस. जी. देसाई |
| मराठ्यांच्या शौर्यकथा | वि. स. गवाणकर |
| वॉलाँग | कर्नल श्याम चव्हाण |

## (३) चरित्र

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| राणा प्रताप | अंजली ठाकूर |
| वर्धमान महावीर | चारुशिला ओक |
| गौतमबुद्ध आणि बोधकथा | श्रीविलास कुलकर्णी |
| स्वामी विवेकानंद | ना. बा. टेंगडी |
| बसवेश्वर | अनुवादिका – अनुराधा लांडगे |
| समर्थ रामदास | प्र. ग. सहस्रबुद्धे |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | अनुवादक – वामन तेलंग |
| भगिनी निवेदिता | मधुकर आंग्रे |
| देवी पद्मिनी | – |
| मॅडम कामा | तारा करंदीकर |
| एक होता कार्व्हर | वीणा गव्हाणकर |

## (४) कविता

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| आपला भारत महान | ममता तावडे |
| चलो डोंगरगाव | अनंत भावे |
| अक्षरबोली | संपादन – नीलिमा करमरकर |
| कवितेच्या गावा | संपादन – नीलिमा करमरकर |
| उत्सवाचे रंग त्यात आम्ही दंग | सुमन फडके |
| शालेय स्फूर्तिगीते | – |
| शालेय संस्कार गीते व देशभक्ती गीते | सुरेश तुप्तेवार |
| रंग गंध झेलू या | दत्ता हलसगीकर |
| शालेय प्रार्थना व गीते | मालती सांगलीकर |

## (५) माहितीपर

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| का व कसे? | सुनील अंबिके |
| आई असंच का? बाबा तसंच का? | निरंजन घाटे |
| विज्ञान – दिंडी | श्रीराम रानडे |
| ज्ञानबिहार | पंढरीनाथ रेगे |
| अचंबित गोष्टी | स्मिता गोडबोले |
| आगळं-वेगळं सृष्टीज्ञान | नंदकुमार टेणी |
| काडेपेटी आणि इतर विज्ञान खेळणी | अरविंद गुप्ता |
| आपली नाणी | परमेश्वरीलाल गुप्ता |
| प्रश्न तुमचे उत्तर आमचे | म. वि. गोखले |
| आपले पूर्वज | बाळ फोंडके |
| सूर्यमालेतील सृष्टीचमत्कार | मोहन आपटे |
| ऋतू-शैशव | मोहन आपटे |

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| कारगिलचे परमवीर | मदन पाटील |
| बहाद्दूर बल्लू | लीला दीक्षित |
| पुढे व्हा | यदुनाथ थत्ते |
| बोक्या सातबंडे भाग – १ | दिलीप प्रभावळकर |
| सुकेशिनी आणि इतर कथा | सुधा मूर्ती |
| मिरी | साने गुरुजी |
| मोहोर | संपादन – शैलजा देशमुख |
| भूत – अद्भुत | रत्नाकर मतकरी |
| चिंकू, चिंपाझी आणि फा. फे. | भा. रा. भागवत |
| सिल्व्हर स्टार | माधुरी पुरंदरे |
| बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर |
| नेगल | विलास मनोहर |

**वाचकवीर योजनेसाठी निवडलेल्या पुस्तकांची यादी**
**इ. ७ वी व ८ वी**

## (१) कथा – कादंबरी

| | |
|---|---|
| स्वाधीन की दैवाधीन | रामचंद्र साळवी |
| आक्रोश | भीमराव गस्ती |
| झ्लाटाज् डायरी | अनु. ज्ञानदा नाईक |
| माणदेशी माणसं | व्यंकटेश माडगूळकर |
| पूर्वरंग | पु. ल. देशपांडे |
| वामन परत न आला | जयंत नारळीकर |
| रसास्वाद कसा घ्याल | - |

## (२) ऐतिहासिक

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| आदर्शांच्या प्रकाशात | अनघा कुकडे – लवळेकर |
| लक्ष्यवेध | रणजित देसाई |
| सम्राट अशोकाचे शिलालेख | विजया गायकवाड |
| पावनखिंड | रणजित देसाई |
| दोन शिलेदार | सुधाकर प्रभू |
| महात्मा गांधी कथामाला भाग –१ | प्रभाकर चौधरी |
| साक्ष इतिहासाची | निनाद बेडेकर |
| सोलापूरचे स्वातंत्र्यलढ्यातील दीपस्तंभ | श्रीकांत येळेगावकर |
| हसरा इतिहास | निनाद बेडेकर |
| महाराज | बाबासाहेब पुरंदरे |
| सुदाम्याचे पोहे | श्री. कृ. कोल्हटकर |
| रोश विरुद्ध ॲडॅम्स | अनु. सदानंद बोरसे |

## (३) चरित्र

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| संत कबीर | गो. तु. पाटील |
| राणी चन्नम्मा | पुष्पा गोटखिंडीकर |
| झांशीची राणी लक्ष्मीबाई | विष्णू श्रीधर जोशी |
| श्रीचैतन्य महाप्रभू | श्रीकांत गोगटे |
| खरेखुरे आयडॉल्स भाग –१ | संपादक – सुहास कुलकर्णी |
| अनंत कान्हेरे | पुष्पा गोटखिंडीकर |
| एक होता कार्व्हर | वीणा गवाणकर |
| अग्निपंख | ए. पी. जे. अब्दुल कलाम |
| एव्हरेस्टच्या कुशीत मी – आत्मकथा | शेर्पा तेनझिंग नोर्गे |
| पोरके दिवस | अरुण खोरे |
| डॉ. आयडा स्कडर | वीणा गवाणकर |
| डॉ. अल्बर्ट श्वाईट्झर | सुमती देवस्थळे |
| आय डेअर | अनु. आशा कर्दळे |

## (४) नाटक

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| इंद्रधनुष्यी नाट्यछटा | ललिता गुप्ते |
| अ ब क ड इ | मंजुश्री गोखले |
| निवडक नाट्यछटा भाग – १ | संपादक – प्रकाश पारखी |
| ज्योतीने उजळल्या ज्योती | रजनी हिरळीकर |
| गाणारा मुलुख | द. मा. मिरासदार |
| दहा धमाल नाट्कल्या | संपा. मनिषा बर्वे, प्रकाश पारखी |
| मोरुची मावशी | प्र. के. अत्रे |
| ७३ शालेय नाट्यछटा | राजीव जोशी |
| निवडक नाट्यछटा भाग ... | संपादक – प्रकाश पारखी |
| कर्मवीरांची लक्ष्मी आणि इतर बालनाटिका | केशव फडणीस |

## (५) प्रवासवर्णन

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| अपरिचित महाराष्ट्र | सुरेश गरसोळे |
| सातासमुद्रापलिकडे | किशोर पवार |
| माझा रशियाचा प्रवास | अण्णाभाऊ साठे |
| इजिप्त एक सफरनामा | विजय घैसास |
| मसाईंच्या देशात | लिली जोशी |
| जगाक्ष मुशाफिरी | निरंजन घाटे |
| सफर श्रीलंकेची | जयंत जोगळेकर |
| भारतातील कलात्मक देवालये भाग – १ | शैला कामत |
| साद ईशान्य भारताची | वा. बा. कर्वे |
| विनू–मनूची परदेशी सफर | लीलावती भागवत |

## (६) माहितीपर

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| प्रश्न तुमचे उत्तर आमचे | डॉ. म. वि. गोखले |
| विज्ञानातील शंका समाधान | ज्ञानेश्वर कुलकर्णी |
| अद्‌भूत घरकुले निसर्गातील | कौमुदी जमखंडीकर |
| अग्नि | वर्षा गजेंद्रगडकर |
| विज्ञान जिज्ञासा | सुधाकर भालेराव |
| विज्ञान परिचय | सुधाकर भालेराव |
| कुतूहल विज्ञानाचे | सुधाकर भालेराव |
| विचारा तुम्ही, सांगतो आम्ही | अनिता रानडे |
| ज्ञान सागरातील शिंपले भाग १ ते ५ | गो. सी. गोखले |
| दैनंदिन विज्ञान | – |
| निसर्गायण | दिलीप कुलकर्णी |

## वाचकवीर योजनेसाठी निवडलेल्या पुस्तकांची यादी इ. ९ वी

### (१) कथा – कादंबरी

| | |
|---|---|
| गोष्टी माणसांच्या | सुधा मुर्ती |
| पाझर आस्थेचे | दत्ता हलसगीकर |
| पांगिरा | विश्वास पाटील |
| कोवळे दिवस | व्यंकटेश माडगूळकर |
| थेंबातलं आभाळ भाग – १ | प्रवीण दवणे |
| चिकन सूप फॉर द सोल | अनु. उषा महाजन |
| रारंगढांग | प्रभाकर पेंढारकर |
| अकरा कोटी गॅलन पाणी | अनिल बर्वे |
| नस्ती उठाठेव | पु. ल. देशपांडे |
| शाळेपासून मुक्ती वर्षा पुरती | राहुल अल्वारिस |
| झोंबी | आनंद यादव |
| आठवणींचे पक्षी | प्र. ई. सोनकांबळे |
| चौघीजणी | शांता शेळके |
| वीज म्हणाली धरतीला | वि. वा. शिरवाडकर |
| पूर्णत्वाचे प्रवासी | शरद कुलकर्णी |
| सुपरक्लोन | पंडित विद्यासागर |

### (२) ऐतिहासिक

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| शाहू महाराजांच्या गोष्टी | दिलीप गुरड, मुकुंद तेलीजरी |
| वन्दे मातरम् – इतिहास कथा | अमरेंद्र गाडगीळ |
| पेशव्यांच्या कथा | म. वि. सोवनी |
| छत्रपती संभाजी | प्र. के. घाणेकर |
| असे झुंजले वीर मराठे | गोपाळ देशमुख |
| अठराशे सत्तावन्नची संग्रामगाथा | वि. स. वाळिंबे |
| काळदरीतील वीरगत | वासुदेव बेलवलकर |
| शूरांची भूमी | वि. स. गवाणकर |
| कथा ही दिवा बादळाची | अनु. वि. स. वाळिंबे |
| स्वामी | रणजित देसाई |
| युद्धविराम आणि होरपळ | अनिल बर्वे |
| युद्धनेतृत्व | दि. वि. गोखले |

### (३) चरित्र

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| एक अदम्य उत्कट चैतन्य | डॉ. स्वर्णलता भिशीकर |
| आम्ही असे घडलो | संपा. नीलिमा करमरकर |
| आयुष्यातील वादळवाटा | संपा. नीलिमा करमरकर |
| स्वत:विषयी | अनिल अवचट |
| देवदूत | संजीव शहा |
| जगायचय प्रत्येक सेकंद! | मंगला केवळे |
| आनंदी गोपाळ | श्री. ज. जोशी |
| भेदिले सूर्यमंडळा | रविंद्र भट |
| एका रानवेड्याची शोधयात्रा | कृष्णमेघ कुंटे |
| इडली, ऑर्किड आणि मी | विठ्ठल कामत |
| माझी जन्मठेप | स्वा. सावरकर |
| राष्ट्रद्रष्टे विवेकानंद | वि. वि. पेंडसे |

### (४) नाटक

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| इथे ओशाळला मृत्यू | वसंत कानेटकर |
| वीज म्हणाली धरतीला | वि. वा. शिरवाडकर |
| दिवाकरांच्या नाट्यछटा | – |
| नटसम्राट | – |
| बहुढंगी नाट्यछटा | संपादक – प्रकाश पारखी |
| अश्रूंची झाली फुले | वसंत कानेटकर |
| तुझे आहे तुजपाशी | पु. ल. देशपांडे |
| कौंतेय | वि. वा. शिरवाडकर |
| ऑथेल्लो | वि. वा. शिरवाडकर |
| रायगडाला जेव्हा जाग येते | वसंत कानेटकर |

### (५) कविता

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| विशाखा | कुसुमाग्रज |
| स्फूर्तिगान भाग ४ | – |
| गाथा | फ. मु. शिंदे |
| जिप्सी | मंगेश पाडगावकर |
| स्वातंत्र्यगीते | संपादक – यदुनाथ थत्ते |
| बहिणाबाईंची गाणी | दत्ता हलसगीकर |
| वैशाखी | ग. दि. माडगूळकर |
| पावसाळी कविता | ना. धों. महानोर |
| झंझावात | सुरेश भट |
| रंगबावरी | इंदिरा |

### ६) माहितीपर

| पुस्तकाचे नाव | लेखक/लेखिका नाव |
|---|---|
| आपली सूर्यमाला | आनंद घैसास |
| दैनंदिन पर्यावरण | दिलीप कुलकर्णी |
| विज्ञान जिज्ञासा | श्री. वि. केळकर |
| प्रश्न तुमचे, उत्तर विज्ञानाचे | हेमंत लागवणकर |
| शास्त्रज्ञांच्या साहसकथा | प्र. न. जोशी |
| ज्ञान आणि मनोरंजन | प्रभाकर सोवनी |
| वेचक वेधक | – |
| विज्ञानातील किस्से | सुनील जोगळेकर |
| नवे शोध नवे तंत्रज्ञान | बि. गो. भागवत |
| चिल्ड्रन्स नॉलेज बँक भाग – १ | सुनीता गुप्ता, नीना अग्रवाल |

# पुस्तक परिचय

विद्यार्थ्यांना पुस्तकांची ओळख व्हावी, त्यांना त्याचे रसग्रहण करता यावे यासाठी पुस्तकप्रदर्शन, पुस्तकपरिचय, पुस्तकाच्या सारांशाचे कथन असे विविध प्रकारचे कल्पक मार्ग वापरावे लागतील. अध्यापकांचा पुस्तकांबद्दलचा, स्वत:च्या वाचनाबद्दलचा, विद्यार्थ्यांबरोबरचा संवाद, ग्रंथालयामार्फत यातले वेगवेगळे उपक्रम, स्पर्धा अशा अनेक मार्गांनी अध्यापकाने प्रयत्न केला तर वाचन संस्कृती शाळेत निर्माण करता येईल.

यातील महत्त्वाचा उत्तम मार्ग म्हणजे विद्यार्थ्याला पुस्तक परिचय लेखन करण्यास शिकवणे. एखादं पुस्तक खूप आवडलं; पुन्हा वाचावसं का वाटलं; याचा स्वत:च्या मनाशी विचार करून तो विचार दुसऱ्यांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करणं. यालाच वाङ्मयाचा रसास्वाद म्हणता येईल.

येथे आपण वाङ्मयाची 'समीक्षा' असा शब्द वापरलेला नाही. ती रसास्वादाची पुढची पायरी असेल. तुम्हाला काय रुचलं, काय खटकलं हे दोन्हीही तुम्हाला तटस्थपणे, जाणकारपणे शोधायला जमणे म्हणजे समीक्षा. परंतु रसास्वादाचे स्वरूप हे कदाचित पूर्णत: वैयक्तिकही असेल.

पुस्तकाचा रसास्वाद लिहिताना त्याचा वाङ्मयप्रकार त्यातील व्यक्तीरेखा, लेखकाची भाषाशैली, त्यातील नाट्य, त्याची मांडणी, त्यातील आशय, विषय या सगळ्याचा कोणता परिणाम वाचत असताना, वाचून झाल्यावर मनावर झाला याबद्दल लेखन करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे. यासाठी विद्यार्थ्यांला प्रथम कोणताही हेतू मनात न ठेवता वाचन करण्यास सांगावे, खरोखरच हे पुस्तक आवडले असेल तरच मनात विश्लेषण करण्यास सांगा.

उदाहरणार्थ विद्यार्थ्याने, पु. ल. देशपांडे यांचं एक विनोदी पुस्तक वाचलंय का विचारा. त्यातील कोणते प्रसंग मुलांना हसवतात याचा विचार करायला सांगा. तेथे अतिशयोक्ती आहे म्हणून हसू येतं की लेखकाने विसंगती शोधलीय हे विचारा. त्यात शाब्दिक कसरतींचा आधार घेतलाय का. प्रसंगनिष्ठ विनोद आहे का; याचा विचारा करायला सांगा. त्यात विनोदी प्रसंगातील सौंदर्य शोधायचा प्रयत्न करायला सांगा. एखादी कथा, कादंबरी असेल तर त्यातील व्यक्तिरेखा सहज फुलत गेल्या आहेत का, त्यांच्या स्वभावाचे बारकावे लेखक अकृत्रिमपणे टिपतो आहे का? हे पाहा. कथानक आकर्षक, उत्कंठावर्धक आहे का? ते पाहा. सुरुवात, शेवट आकर्षक आहे का? हे विचारा. इ. मुद्द्यांचा विचार करावयास लावा. एखादे चरित्र वाचताना त्या चरित्र नायकाचे कोणते गुणविशेष विद्यार्थ्याला भारावून टाकतात ते पाहा. ते लेखकाने लालित्यपूर्ण रीतीने मांडले आहेत का; कोणत्या चिरंतर मूल्यांचा लेखक मागोवा घेतो आहे याचा विचार करायला सांगा. लेखकाच्या भाषाशैलीची कोणती वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना जाणवतात ते शोधा. हळूहळू असा विचार करायला मुले लागली की त्यांच्या मनात ठसलेले चित्र, त्याचे सौंदर्य, त्यांच्या डोळ्यासमोर साकार व्हायला लागेल. तोच त्यांनी अनुभवलेल्या त्या पुस्तकाचा रसास्वाद!

मराठी क्रमिक पुस्तकाच्या अभ्यासाबरोबरच आनंद मिळवता मिळवता असं अवांतर वाचन केलं, तर तो असेल त्याच्या भावी जीवनातील एक आनंददायी विरंगुळा; नकळत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक आकार लाभेल; अनेक अनुभव शब्दाच्या विश्वात घेतील आणि ते शब्दात व्यक्तही करतील. त्यातून त्यांना केवळ वाङ्मयाचाच नव्हे तर इतर कलांचाही रसास्वाद घेण्यासाठी उपयुक्त अशी एक दृष्टी लाभेल.


**“In a good bookroom you feel in some mysterious way that you are absorbing the wisdom contained in all the books through your skin, without even opening them.”**

**? Mark Twain**


## Discussion with Experts : Psychological development


तरंग मनाचे – दु:ख


तरंग मनाचे – भिती


तरंग मनाचे – आनंद

## Video Series



छंद आकाशदर्शनाचा – भाग १



**Children's Learning**
**Teacher's Facilitation - 1**

## Slide Shows



## उपयुक्त संकेत स्थळे

ग्रंथालय समृद्धीसाठी, वाचनासाठी, संदर्भासाठी, ई पुस्तकांसाठी, ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी उपयुक्त वेबसाईट

www.esahity.com

www.marathinovels.net

www.marathisahitya.com

www.marathivishwakosh.in

www.granthdwar.com

www.bookganga.com/eBooks

www.kharedi.maayboli.com/shop/home.php

www.kusumagraj.org

www.boltipustake.blogspot.in

www.rmvs.maharashtra.gov.in/rmvs

www.balbharatikavita.blogspot.in

|| राष्ट्रदेवा: भवेम ||


# ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org
Visit us at: www.erc-pune.org